## नियमीत दिवाणी दावा क्र. २९७/२०२४ – नि. क्र. ५, २६, ४१ खालील आदेश

ब्रम्हदेव सदाशिव बाबर वि. हणमंत भिमराव काटे इ.

वादीने निशाणी क्रमांक ५ वरील अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा आदेश ३९, नियम ०१ व ०२ अन्वये प्रतिवादी विरुध्द तुर्तातुर्त मनाईसाठी दाखल कला आहे. वादीने निशाणी क्रमांक २६ वरील अर्ज ॲड इंटेरियम तुर्तातुर्त ताकीद मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादीने निशाणी क्रमांक ४१ वरील अर्ज दिवाणी प्रक्रिया संहीता, १९०८ चा आदेश ३९ व नियम १ व २ अन्वये वादी विरुध्द तुर्तातुर्त मनाईसाठी दाखल केला आहे.

२. वादीची निशाणी क्रमांक ५ वरील अर्जातील कथने –

मिळकतीचे वर्णनः– डि. सोलापूर सब डि व ता. सांगोला पैकी मौजे लिगाडेवाडी येथील जमीन मिळकत –

| अ.क. | गट नंबर | क्षेत्र हे–आर |
|---|---|---|
| १. | ३२५ | २–०७ |
| | | पो.ख. ०–१० |
| | | एकुण २–१७ |
| | | पैकी ०–८० |

यासी चतुःसिमा खालीलप्रमाणे –

पूर्वेस – गट नं.३२५ पैकी प्रतिवादी यांची जमिन

दक्षिणेस – गट नंबर ३२३

पश्चिमेस – गट नं.३२५ पैकी अंकुश शिंदे यांची जमिन

उत्तरेस – गट नं.३२६

वरीलप्रमाणे वर्णनाची मिळकत व सदर जमीन मिळकतीतील जाणेयेणेचे रस्त्याचे हक्कासह वगैरे सर्व तदंगभुत वस्तुसह मिळकती.

३. वादीचे थोडक्यात कथन असे की, दावा कलम १ मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत यातील वादी याची खरेदी मालकी वहिवाटीची मिळकत आहे. वादीने दावा कलम १

मध्ये वर्णन केलेली मिळकत मच्छिंद्र भानूदास चौगुले यांचेकडून दि.६/१०/२०२३ रोजी रक्कम रु. ३,३५,०००/– या रक्कमेस नोंदणीकृत खरेदी खत क्र. ६१००/२०२३ प्रमाणे खरेदी केलेली आहे. खरेदी तारखेपासून वादीची दावा मिळकतीत शांततामय मागनि कब्जेवहिवाट चालू आहे.

४. वादीचे पुढील कथन असे की, दावा मिळकत मुळची प्रतिवादी यांचे मालकी वहिवाटीची होती. प्रतिवादीने दावा मिळकत त्यांचे कायदेशीर गरजेसाठी दि. ६/८/२०२० रोजी मच्छिद्र भानूदास चौगुले यांना विक्री केलेली होती. त्यानंतर मच्छिंद्र भानूदास चौगुले यांना अर्थिक अडचण निर्माण झाल्यामुळे त्यांनी दावा मिळकत वादीस विक्री केलेली आहे. खरेदीप्रमाणे वादी दावा मिळकतीचे कायदेशीर मालक वहिवाटदार आहेत. दावा कलम १ मध्ये वादीने खरेदी केलेल्या जमीन मिळकतीशी यातील प्रतिवादी यांचा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध नव्हता व नाही. प्रतिवादी हा वादीचे ०हे–८०आर या मिळकतीच्या लगत पूर्व बाजूस त्याचे मालकीची मिळकत ०हे–२३.५०आर, पो.ख. ०हे–०५आर ही मिळकत वहिवाटीत असून वादीच्या मिळकतीमध्ये घूसण्याचा प्रयत्न करुन वादीस दावा मिळकतीतून हुसकावून लावण्याचा प्रयत्न करु लागलेला आहे.

५. वादीचे पुढील कथन असे की, प्रतिवादी यास वादीने दावा मिळकत खरेदी केल्याचा राग असुन प्रतिवादी हा वादीचे दावा मिळकतीतील शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करण्याचा वारंवार प्रयत्न करु लागलेला आहे. तसेच वादीचे दावा मिळकतीतील पिकांचे नुकसान करण्याचा प्रयत्न करु लागलेला आहे. वादीने प्रतिवादीस मध्यस्थी व नातेवाईकांचे मार्फत अनेकवेळा समजावून सांगण्याचा प्रयत्न केला परंतु प्रतिवादी ऐकण्याचे मनःस्थितीत नाही. प्रतिवादी हा आडदांड व गुंड प्रवृत्तीचा इसम असून मनुष्यबळाचे जोरावर वादीस दावा मिळकतीतून हुसकावून लावण्याचा प्रयत्न करु लागलेला आहे. वादी हे दि.१/६/२०२४ रोजी दावा मिळकतीत मेहनत मशागत करित असताना प्रतिवादी हा वादीस दावा मिळकतीतून हुसकावून लावणेकरीता अर्वाच्य भाषेत शिवीगाळी करुन मारहाण करण्यासाठी अंगावर धावून येवू लागला. त्यावेळी प्रतिवादी हा वादीस म्हणत होता की, "तु जमीनीत पाय ठेवायचा नाही, पुन्हा जमीनीत दिसलास तर हातपाय तोडून ठेवीन." प्रतिवादी

याचे गैरकृत्यांना मे. कोर्टाच्या आदेशाशिवाय रोखणे कठीण झालेले आहे. सबब वादी हे दावा मिळकतीचे कायदेशीर मालक वहिवाटदार असल्याने वादीचे दावा मिळकतीतील शांततामय कब्जेवहिवाटीस प्रतिवादी यांनी स्वतः अगर त्याचे मार्फत नोकर–चाकर, नातेवाईक वैगेर इसमार्फत हरकत अडथळा करु नये अशा प्रकारचा निरंतर ताकिदीचा आदेश प्रतिवादीविरुद्ध होणे न्यायाचे कामी आवश्यक व गरजेचे झाले आहे. सबब वादीस हा दावा दाखल करणे भाग पडले आहे.

६. वादीचे पुढील कथन असे की, मुळ दाव्याचा अंतीम निकाल लागण्यास बराच कालावधी लागणार आहे. प्रतिवादी हा वारंवार वादीस दावा मिळकतीतून हूसकावून लावण्याचा प्रयत्न करून वादीचे दावा मिळकतीतील शांततामय कब्जे वहीवाटीस हरकत अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. वादीने प्रथमदर्शनी केस मांडलेली आहे. न्यायाचा समतोल वादीचे बाजूने आहे. वादी हा स्वच्छ हाताने मे. कोर्टात आलेला आहे. वादीस दाव्यावे कामी यश येण्याची खात्री आहे. प्रतिवादी विरूध्द तुर्तातुर्त ताकीदीचा आदेश झाल्यास प्रतिवादीचे काहीही नुकसान होणार नाही. याउलट प्रतिवादीविरूध्द तुर्तातुर्त ताकीदीचा आदेश न झाल्यास प्रतिवादीचे दंडेलशाहीचे कृत्यांना बळ मिळणार असून वादीचे अतोनात कधीही न भरून येणारे असे नुकसान होणार असून त्याची मोजदाद पैशाचे स्वरूपात करता येणार नाही. दाव्यात/अर्जात नमुद केलेल्या सर्व कारणास्तव दावा कलम १ मध्ये वर्णन केलेल्या जमीन मिळकतीतील वादीचे शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा होईल, वादीस दावा मिळकतीतून हुसकावून लावले जाईल अशा प्रकारचे कोणतेही गैरकृत्य प्रतिवादी यांनी स्वतः अगर त्यांचेतर्फे नोकर–चाकर, कुलमूकत्यारधारक, नातेवाईक वगैरे मार्फत करू नयेत अशा प्रकारचा तुर्तातुर्त ताकिदीचा आदेश दाव्याच्या अंतिम निकालापर्यंत प्रतिवादीविरूद्ध करण्यात यावा, अशी मागणी वादीने केली आहे.

७. प्रतिवादी यांनी नि.२३ नुसार कैफियत व म्हणणे दाखल करुन वादीच्या अर्जातील विरोधी कथने नाकारली आहेत. प्रतिवादींचे कथन की, प्रतिवादी यांचे मालकीची शेतजमीन मौजे लिगाडेवाडी येथे गट नंबर ३२५ क्षेत्र २हे–०७आर, पो.ख.०–१०आर, आकार ०–७० पैसे यापैकी ०१हे–०३आर, आकार ०–३५ पैसे ही मिळकत मालकी हक्क

अधिकाराची व प्रत्यक्ष कबजे वहिवाटीची आहे. सदरची शेतजमीन प्रतिवादीने स्वतः कसून त्यामध्ये ज्वारी, बाजरी मका यासारखी पिके आज अखेर घेत आलेले आहेत. तसा प्रतिवादी यांना हक्क व अधिकार होता व आहे. प्रतिवादी यांना ऑगस्ट २०२० मध्ये जमीन खरेदी करणेसाठी व तसेच घर प्रपंचासाठी खर्चासाठी आर्थिक अडचण निर्माण झाली, पैशाची अत्यंत गरज भासू लागली. यातील प्रतिवादी यांनी आजूबाजूचे लोकांकडे पैशाची मागणी केली असता जवळचे लोकांनी पैसे नसलेची कारणे दिलेली होती व मच्छिंद्र भानुदास चौगुले रा चौपडी ता सांगोला यांचा पुर्वीपासून सांगोला तालुक्यात व आसपासच्या गावामध्ये खाजगी सावकारी करीत असल्याने त्यांचेकडे पैसे मागणेबाबत सुचविले. मच्छिंद्र भानुदास चौगुले रा चोपडी ता सांगोला हा सांगोला तालुक्यामध्ये व आसपासचे गावातील लोकांना व्याजाने पैसे देतात व त्याच्या मोबदल्यात सदरहू पैशास तारण म्हणून व्याजाने पैसे घेणाऱ्या शेतकऱ्याकडून लोकांकडून त्याच्या शेतजमीनी व इतर मिळकतीबाबत तारण दस्त करून घेतात व व्याजाने पैसे घेणाऱ्या लोकांकडून व्याजासह संपूर्ण पैसे मिळालेनंतर सदरचे खरेदीखत पुन्हा मुळ मालकांच्या नावे फिरवून देतात. अशा प्रकारे सावकारी व्यवसाय करण्याची मच्छिंद्र भानुदास चौगुले यांची पध्दत आहे व तसा ते सावकारी व्यवसाय करतो. त्यासंदर्भात अनेक लोकांच्या सावकारी विषयी तक्रारी ही आहेत. सदरची बाब प्रतिवादी यांना नुकतीच समजून आली आहे.

८. प्रतिवादीचे पुढे असे कथन आहे की, सदर वेळी कोणताही पर्याय नसल्यामुळे प्रतिवादी यांनी विचार केला व गावातील सावकार मच्छिंद्र भानुदास चौगुले यांचेकडून हातउसने पैसे घेणेचे ठरविले. त्याप्रमाणे प्रतिवादीने मच्छिंद्र भानुदास चौगुले यांना भेटलो व वर नमुद पैशाची अडचण सांगितली. त्यावेळी मच्छिंद्र भानुदास चौगुले याने रक्कम रूपये ७,००,०००/– सात लाख रूपये देणेचे मान्य केले. परंतु त्यावेळी त्याने प्रतिवादीस त्याची कर्जावू पैसे देतानाची वर नमुद केलेली पध्दत सांगितली व कर्जावू रकमेच्या मोबदल्यात तारण म्हणून शेतजमीन लिहून दयावी लागेल म्हणून सांगितले ती अट प्रतिवादीने मान्य केली व त्याप्रमाणे मच्छिंद्र भानुदास चौगुले याने प्रतिवादीस कर्जावू रक्कम ७,००,०००/शेकडा दरमहा २ टक्के व्याजाने दिले व त्यास तारण म्हणून प्रतिवादीने त्यांचे नावे असलेली दावा मिळकत तारण म्हणून दिली व त्याप्रमाणे दिनांक ०६/०८/२०२० रोजी दस्त नं २९११/२०२० अन्वये प्रतिवादी यांचे व मच्छिंद्र भानुदास चौगुले यांच्या दरम्यान सदरचा नोंदणीकृत दस्त

झाला. जरी सदरच्या दस्तामध्ये कायदेशीर अडचणीमुळे खरेदीखत असा उल्लेख असला तरी प्रत्यक्षात मात्र तो तारणदस्त आहे. याची संपूर्ण माहिती मच्छिंद्र भानुदास चौगुले यास आहे. सदरचा व्यवहार हा खरेदीखताचा नसून तो सावकारी स्वरूपाचे पैशास तारण स्वरूपीचा आहे.

९. प्रतिवादीचे पुढे असे कथन आहे की, त्यानंतर प्रतिवादीने सदर मच्छिंद्र भानुदास चौगुले यांची व्याज मुद्दलापोटीची रक्कम रूपये १८५,०००/– दिनांक ३१/१२/२०२० रोजी बँक ऑफ महाराष्ट्र शाखा वाटंबरे या खात्यावरून सदर मच्छिंद्र भानुदास चौगुले यांचे सांगणेप्रमाणे धनाजी शिवाजी बाबर याचे नावे प्रतिवादी यांचे खात्यावरून आर टी जी एस द्वारे दिले. तदनंतर प्रतिवादीने दिनांक २१/०३/२०२२ रोजी प्रतिवादीचे मोठा मुलगा गौतम याचे भारतीय स्टेट बैंक शाखा सांगोला या बँक खात्यावरून रक्कम रुपये ५,००,०००/– मच्छिंद्र चौगुले यास काढून रोख स्वरूपात दिले. त्यानंतर उर्वरीत रक्कम सन २०२२ अखेर संपूर्णपणे परतफेड केलेली आहे. तदनंतर प्रतिवादीने मच्छिंद्र भानुदास चौगुले यांचेकडे वारंवार सदर जमीन फिरवून देणेबाबत मागणी करून ही त्याने प्रतिवादी यांची जमीन प्रतिवादीस परत प्रतिवादी यांचे नावे करून देणेस टाळाटाळ करू लागला व प्रतिवादीस म्हणाला की, तुम्ही अजून पाच लाख रूपये व्याज मला दया, मगच मी तुमची जमीन तुम्हास परत देतो, नाहीतर तुमची जमीन तिन्हाईतास विकून टाकतो अशी धमकी दिली. तदनंतर प्रतिवादीने मच्छिंद्र भानुदास चौगुले यास समजावून सांगितले व तुमची संपूर्ण व्याजमुद्दलाची रक्कम परत दिलेबाबत सांगितले परंतु सदरील मच्छिंद्र भानुदास चौगुले हा प्रतिवादीस जादा व्याजाची मागणी करीत आहे व जादा व्याजाचे पैशासाठी तगादा लावून शारिरीक व मानसिक त्रास देत आहे.

१०. प्रतिवादीचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादीने वारंवार मच्छिंद्र भानुदास चौगुले यास जमीन प्रतिवादीचे नावे फिरवून देणेबाबत मागणी केली असता सदरील जमीन विक्री करणेची भाषा करीत होता. त्याबाबत प्रतिवादी यांचे व चौगुले यांचेतील झालेल्या व्यवहाराचा मध्यस्थी इसम बाळासाहेब नामदेव मिसाळ रा चिणके ता सांगोला मोबाईल ९८९०३२२४२४ या इसमासोबत झालेल्या संभाषणाचे रेकॉर्डीग देखील प्रतिवादी यांचेकडे आहे. सदरील जादा रक्कम देणेस प्रतिवादीने नकार दिल्यामुळे सदरील सावकार याने प्रतिवादी

यांची जमीन बेकायदेशीरपणे वादी यांचे नावे दिनांक ०६/१०/२०२३ रोजी दस्त नं.६१००/२०२३ ने बेकायदेशीरपणे विनामोबदला बिनकबजाचा, पोकळस्वरूपी दस्त अस्तित्वात आणलेला आहे. सदर तथाकथित दस्ताने वाद मिळकतीचा प्रत्यक्ष कबजा वादी यांना मिळालेला नव्हता व नाही. सदर दावा मिळकतीत आजही प्रतिवादी यांची प्रत्यक्ष कबजे वहिवाट होती व आहे. असे असताना वरील सावकार इसम याने प्रतिवादीस जादा व्याजाची रक्कम देणेबाबत जास्तच तगादा लावत आहे व प्रतिवादी यांचे जातीवरून शिवीगाळ, दमदाटी करीत आहेत. सदर मच्छिंद्र चौगुले यांचे विरूध्द प्रतिवादीने सावकारी कृत्याबाबत संबंधित पोलीस स्टेशनला व मा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था सोलापूर, मा सहाय्यक उपनिबंधक सहकारी संस्था पंढरपूर यांचेकडे तक्रारीही केलेल्या आहेत. सदरची चौकशी अदयाप प्रलंबीत आहे.

११. प्रतिवादीचे पुढे असे कथन आहे की, सदर तथाकथित खरेदीखताचे आधारे सदरील वादी याने सदरील सावकार याचे सांगणेवरून दावा मिळकत वहिवाटणेकामी प्रतिवादीस हरकत अडथळा करीत आहे. असे असताना वादीने केवळ खोटेपणाने त्यास कसलाही दावा मिळकतीमध्ये कबजा प्राप्त झालेला नसताना सदरचा खोटा दावा दाखल केलेला आहे व प्रतिवादी यांचे विरुध्द निरंतर ताकीदीची मागणी केलेली आहे. वादीने खरी वस्तुस्थिती लपवून ठेवून खोटया मजकूराचा दावा दाखल केलेला असल्याने वादी निरंतर ताकीदीसारखी दाद मिळणेस पात्र नाही. त्यामुळे वादी यांना कोणतीही सकृतदर्शनी केस नाही. न्यायाचा समतोल हा वादीचे बाजूने नसून तो प्रतिवादीचे बाजूने आहे. वादीचे दाव्यास कोणतेही कारण घडलेले नाही. वादीने दाव्यात नमुद केलेले कारण हे धादांत खोटे व काल्पनीक आहे. दावा मिळकतीत प्रतिवादी यांची कबजे वहिवाट होती व आहे. त्यामुळे वादीस प्रतिवादीने दावा मिळकत वहिवाटणेस हरकत अडथळा करणेचा प्रश्नच येत नाही. वादीचा दावा कायदयाने चालू शकत नाही. तो रद्द होणेस पात्र आहे. वादीने निष्कारण खोटा दावा दाखल करून या प्रतिवादी यांना खर्चात, आणि नुकसानीत घातले म्हणून वादीकडून प्रतिवादीस नुकसानी दाखल खर्च रूपये पंचवीस हजार रूपये देवविणेत यावे, अशी विनंती प्रतिवादीने केली आहे.

१२. वादीतर्फे निशाणी क्र.२६ वर ॲड इंटेरियम तुर्तातुर्त ताकीद आदेश मिळण्यासाठी केला आहे. वादीचे असे कथन आहे की, सदरचे नि.५ तुर्तातुर्त ताकीद अर्जावर युक्तीवादाकरीता तारीख नेमलेली आहे. वादी हे तुर्तातुर्त ताकीद अर्जावरती युक्तीवाद करणेत तयार आहेत. प्रतिवादी हे तुर्तातुर्त ताकीद अर्जाचे कामकाज चालविणेस जाणीवपुर्वक टाळाटाळ करीत आहेत. नि.५ चे कामकाज गुणावगुणावर चालुन अंतिम न्यायनिर्णय होणेस बराच कालावधी लागणार आहे. दरम्यानचे काळात यातील प्रतिवादी हे दावा कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीतील वादीच्या शांततामय कब्जेवहीवाटीस हरकत, अडथळा करणेचा प्रयत्न करु लागलेले आहेत. प्रतिवादी यांचे गैरकृत्यामुळे वादी यांना दावा मिळकत मालकी हक्काने कब्जेवहीवाट करणे अडचणीचे व त्रासाचे होवु लागलेले आहे. प्रतिवादी आडदांड मनुष्यबळाचे जोरावर वादीला दावा मिळकतीतुन हुसकावुन लावणेची दाट शक्यता आहे. तरी प्रस्तुतकामी नि.५ चे अंतिम न्यायनिर्णयापर्यंत यातील प्रतिवादी यांनी वादी यांचे दावा मिळकतीतील शांततामय कब्जेवहीवाटीस हरकत, अडथळा करु नये, दावा मिळकतीतुन वादीस हुसकावुन लावु नये अशा प्रकारचा ॲड इंटेरियम तुर्तातुर्त ताकीदीचा आदेश प्रतिवादी यांचेविरुध्द करण्यात यावा.

१३. प्रस्तुत निशाणी क्र.२६ वरील अर्जावर प्रतिवादीतर्फे असे म्हणणे मांडले की, प्रस्तुतचा अर्ज धादांत खोटा, चुकीचा वस्तुस्थितीचा विपर्यास करणारा असुन प्रतिवादीस मान्य व कबुल नाही. वादीस सकृतदर्शनी केस नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

१४. प्रतिवादीतर्फे, वादीने दावा मिळकत हस्तांतरीत करुन नये असा तुर्तातुर्त मनाई मिळणेचा अर्ज नि.क्र.४१ वर दाखल केला आहे. प्रतिवादीचे असे कथन आहे की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीचे विरूध्द मनाई ताकीद होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत कामी यातील प्रतिवादी यांनी हजर होवून वादीचे दावेस कैफियत व म्हणणे दाखल केलेले आहे. प्रस्तुत काम नि.५ चौकशीवर नेमलेले आहे. प्रतिवादी यांचे मालकीची शेतजमीन मौजे लिगाडेवाडी येथे गट नंबर ३२५ क्षेत्र २ हे ०७ आर पोख ०–१० आर आकार ०–७० पैसे यापैकी ०१हे–०३आर आकार ०–३५ पैसे ही मिळकत मालकी हक्क अधिकाराची व प्रत्यक्ष कबजे वहिवाटीची आहे. सदरची शेतजमीन प्रतिवादीने स्वतः कसून त्यामध्ये ज्वारी,

बाजरी मका यासारखी पिके आज अखेर निम घेत आलेले आहेत. तसा प्रतिवादी यांना हक्क व अधिकार होता व आहे.

१५. प्रतिवादीचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी यांना ऑगस्ट २०२० मध्ये जमीन खरेदी करणेसाठी व तसेच घर प्रपंचासाठी खर्चासाठी आर्थिक अडचण निर्माण झाली, पैशाची अत्यंत गरज भासू लागली. यातील प्रतिवादी यांनी आजूबाजूचे लोकांकडे पैशाची मागणी केली असता जवळचे लोकांनी पैसे नसलेची कारणे दिलेली होती व मच्छिंद्र भानुदास चौगुले रा. चोपडी ता. सांगोला यांचा पूर्वीपासून सांगोला तालुक्यात व आसपासच्या गावामध्ये खाजगी सावकारी करीत असल्याने त्यांचेकडे पैसे मागणेबाबत सुचविले. मच्छिंद्र भानुदास चौगुले रा चोपडी ता सांगोला हा सांगोला तालुक्यामध्ये व आसपासचे गावातील लोकांना व्याजाने पैसे देतात व त्याच्या मोबदल्यात सदरहू पैशास तारण म्हणून व्याजाने पैसे घेणाऱ्या शेतकऱ्याकडून लोकांकडून त्याच्या शेतजमीनी व इतर मिळकतीबाबत तारण दस्त करून घेतात व व्याजाने पैसे घेणाऱ्या लोकांकडून व्याजासह संपूर्ण पैसे मिळालेनंतर सदरचे खरेदीखत पुन्हा मुळ मालकांच्या नावे फिरवून देतात. अशा प्रकारे सावकारी व्यवसाय करण्याची मच्छिंद्र भानुदास चौगुले यांची पध्दत आहे व तसा ते सावकारी व्यवसाय करतो. त्यासंदर्भात अनेक लोकांच्या सावकारी विषयी तक्रारी ही आहेत ही बाब प्रतिवादी यांना नुकतीच समजून आली आहे.

१६. प्रतिवादीचे पुढे असे कथन आहे की, सदर वेळी कोणताही पर्याय नसल्यामुळे प्रतिवादी यांनी विचार केला व गावातील सावकार मच्छिंद्र भानुदास चौगुले यांचेकडून हातउसने पैसे घेणेचे ठरविले. त्याप्रमाणे प्रतिवादीने मच्छिंद्र भानुदास चौगुले यांना भेटलो व वर नमुद पैशाची अडचण सांगितली. त्यावेळी मच्छिंद्र भानुदास चौगुले याने रक्कम रूपये ७,००,०००/- सात लाख रूपये देणेचे मान्य केले, परंतु त्यावेळी त्याने प्रतिवादीस त्याची कर्जावू पैसे देतानाची वर नमुद केलेली पध्दत सांगितली व कर्जावू रकमेच्या मोबदल्यात तारण म्हणून शेतजमीन लिहून दयावी लागेल म्हणून सांगितले ती अट प्रतिवादीने मान्य केली व त्याप्रमाणे मच्छिंद्र भानुदास चौगुले याने प्रतिवादीस कर्जावू रक्कम रुपये ७,००,०००/- शेकडा दरमहा २ टक्के व्याजाने दिले व त्यास तारण म्हणून प्रतिवादीने त्यांचे नावे असलेली

दावा मिळकत तारण म्हणून दिली व त्याप्रमाणे दिनांक ०६/०८/२०२० रोजी दस्त नं २९११/२०२० अन्वये प्रतिवादी यांचे व मच्छिंद्र भानुदास चौगुले यांच्या दरम्यान सदरचा नोंदणीकृत दस्त झाला. जरी सदरच्या दस्तामध्ये कायदेशीर अडचणीमुळे खरेदीखत असा उल्लेख असला तरी प्रत्यक्षात मात्र तो तारणदस्त आहे. याची संपूर्ण माहिती मच्छिंद्र भानुदास चौगुले यास आहे. सदरचा व्यवहार हा खरेदीखताचा नसून तो सावकारी स्वरूपाचे पैशास तारण स्वरूपीचा आहे.

१७. प्रतिवादीचे पुढे असे कथन आहे की, त्यानंतर प्रतिवादीने सदर मच्छिंद्र भानुदास चौगुले यांची व्याज मुद्दलापोटीची रक्कम रूपये १,८५,०००/- दिनांक ३१/१२/२०२० रोजी बँक ऑफ महाराष्ट्र शाखा वाटंबरे या खात्यावरून सदर मच्छिंद्र भानुदास चौगुले यांचे सांगणेप्रमाणे धनाजी शिवाजी बाबर याचे नावे प्रतिवादी यांचे खात्यावरून आर टी जी एस द्वारे दिले. तदनंतर प्रतिवादीने दिनांक २१/०३/२०२२ रोजी प्रतिवादीचे मोठा मुलगा गौतम याचे भारतीय स्टेट बैंक शाखा सांगोला या बँक खात्यावरून रक्कम रूपये ५,००,०००/- मच्छिंद्र चौगुले यास काढून रोख स्वरूपात दिले. त्यानंतर उर्वरीत रक्कम सन २०२२ अखेर संपूर्णपणे परतफेड केलेली आहे. तदनंतर प्रतिवादीने मच्छिंद्र भानुदास चौगुले यांचेकडे वारंवार सदर जमीन फिरवून देणेबाबत मागणी करून ही त्याने प्रतिवादी यांची जमीन प्रतिवादीस परत प्रतिवादी यांचे नावे करून देणेस टाळाटाळ करू लागला व प्रतिवादीस म्हणाला की, तुम्ही अजून पाच लाख रूपये व्याज मला दया, मगच मी तुमची जमीन तुम्हास परत देतो, नाहीतर तुमची जमीन तिन्हाईतास विकून टाकतो अशी धमकी दिली. तदनंतर प्रतिवादीने मच्छिंद्र भानुदास चौगुले यास समजावून सांगितले व तुमची संपूर्ण व्याजमुद्दलाची रक्कम परत दिलेबाबत सांगितले परंतु सदरील मच्छिंद्र भानुदास चौगुले हा प्रतिवादीस जादा व्याजाची मागणी करीत आहे व जादा व्याजाचे पैशासाठी तगादा लावून शारिरीक व मानसिक त्रास देत आहे. प्रतिवादीने वारंवार मच्छिंद्र भानुदास चौगुले यास जमीन प्रतिवादीचे नावे फिरवून देणेबाबत मागणी केली असता सदरील जमीन विक्री करणेची भाषा करीत होता. त्याबाबत प्रतिवादी यांचे व चौगुले यांचेतील झालेल्या व्यवहाराचा मध्यस्थी इसम बाळासाहेब नामदेव मिसाळ रा चिणके ता सांगोला मोबाईल ९८९०३२२४२४ या इसमासोबत झालेल्या संभाषणाचे रेकॉर्डीग देखील प्रतिवादी यांचेकडे आहे.

१८. प्रतिवादीचे पुढे असे कथन आहे की, सदरील जादा रक्कम देणेस प्रतिवादीने नकार दिल्यामुळे सदरील सावकार याने प्रतिवादी यांची जमीन बेकायदेशीरपणे वादी यांचे नावे दिनांक ०६/१०/२०२३ रोजी दस्त नं ६१००/२०२३ ने बेकायदेशीरपणे विनामोबदला बिनकबजाचा, पोकळस्वरूपी दस्त अस्तित्वात आणलेला आहे. सदर तथाकथित दस्ताने वाद मिळकतीचा प्रत्यक्ष कबजा वादी यांना मिळालेला नव्हता व नाही. सदर दावा मिळकतीत आजही प्रतिवादी यांची प्रत्यक्ष कबजे वहिवाट होती व आहे. असे असताना वरील सावकार इसम याने प्रतिवादीस जादा व्याजाची रक्कम देणेबाबत जास्तच तगादा लावत आहे व प्रतिवादी यांचे जातीवरून शिवीगाळ, दमदाटी करीत आहेत. सदर मच्छिंद्र चौगुले यांचे विरूध्द प्रतिवादीने सावकारी कृत्याबाबत संबंधित पोलीस स्टेशनला व मा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था सोलापूर, मा सहाय्यक उपनिबंधक सहकारी संस्था पंढरपूर यांचेकडे तक्रारीही केलेल्या आहेत. सदरची चौकशी अदयाप प्रलंबीत आहे.

१९. प्रतिवादीचे पुढे असे कथन आहे की, सदर तथाकथित खरेदीखताचे आधारे सदरील वादी याने सदरील सावकार याचे सांगणेवरून दावा मिळकत वहिवाटणेकामी प्रतिवादीस हरकत अडथळा करीत आहे. असे असताना वादीने केवळ खोटेपणाने त्यास कसलाही दावा मिळकतीमध्ये कबजा प्राप्त झालेला नसताना सदरचा खोटा दावा दाखल केलेला आहेव प्रतिवादी यांचे विरूध्द निरंतर ताकीदीची मागणी केलेली आहे.

२०. प्रतिवादीचे पुढे असे कथन आहे की, वादीने खरी वस्तुस्थिती लपवून ठेवून खोटया मजकूराचा दावा दाखल केलेला असल्याने वादी निरंतर ताकीदीसारखी दाद मिळणेस पात्र नाही. त्यामुळे वादी यांना कोणतीही सकृतदर्शनी केस नाही. न्यायाचा समतोल हा वादीचे बाजूने नसून तो प्रतिवादीचे बाजूने आहे. वादीचे दाव्यास कोणतेही कारण घडलेले नाही. वादीने दाव्यात नमुद केलेले कारण हे धादांत खोटे व काल्पनीक आहे. दावा मिळकतीत प्रतिवादी यांची कबजे वहिवाट होती व आहे. त्यामुळे वादीस प्रतिवादीने दावा मिळकत वहिवाटणेस हरकत अडथळा करणेचा प्रश्नच येत नाही. वादीचा दावा कायदयाने चालू शकत नाही. तो रद्द होणेस पात्र आहे.

२१. प्रतिवादीचे पुढे असे कथन आहे की, येणेप्रमाणे वस्तुस्थिती असताना यातील वादी यांनी दिनांक ०६/१२/२०२७ रोजी दावा मिळकतीत येवून प्रतिवादी यांना शिवीगाळ करुन दावा मिळकतीचे जी.पी.आर.एस. ॲपद्वारा दावा मिळकतीचे पिक पाण्याचे फोटो काढून नेलेले आहेत. वादी हा सावकारी व्यवसाय करणारा इसम असून वादी दावा मिळकतीवर मोठया प्रमाणात कर्ज काढून दावा मिळकतीवर बोजा निर्माण करण्याची दाट शकयता निर्माण झालेली आहे. तसे झालेस प्रतिवादी यांचे दावा मिळकतीत असणारे हक्क व अधिकार कायमपणे डावलले जावून कधीही न भरुन येणारे असे अपरीमीत नुकसान होणार आहे.

२२. प्रतिवादीचे पुढे असे कथन आहे की, वादीच्या सदरच्या कृत्यास मे. कोटचि आदेशाशिवाय अटकाव होणे शक्य होणार नाही. वादी हे त्यांचे कृत्यामध्ये यशस्वी झालेस दावेचे कामामध्ये गुंतागुंत निर्माण होणारी आहे. प्रतिवादी यांना सकृतदर्शनी केस आहे. न्यायाचा समतोल हा प्रतिवादी यांचे बाजुने आहे. सबब प्रतिवादी यांनी अशी विनंती केली आहे की, प्रतिवादी यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेत यावा. प्रस्तुत कामी वादी यांनी दावा मिळकतीचे कोणत्याही मार्गे हस्तांतरण होईल, अथवा कर्जे बोजे निर्माण होतील गहाण, दान, लिज, अशा प्रकारचे दावा मिळकती संदर्भात कोणतेही व्यवहार करु नये अशी तुर्तातुर्त मनाई ताकीद वादींना देवविण्यात यावी.

२३. <u>वादीतर्फे प्रतिवादी यांचे तुर्तातुर्त मनाई मिळणेसाठीचा अर्ज नि.४१ च्या अर्जावर म्हणणे निशाणी क्र.४४ वर दाखल केले आहे</u>. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी यांचा नि.नं. ४१ चा अर्ज चुकीचा, बेकायदेशीर असून सदरचा अर्ज प्रथमदर्शनी रद्द होणेस पात्र आहे. यातील प्रतिवादी यांची दाव्याचेकामी कोणत्याही प्रकारची कायमस्वरूपी मागणी नसल्यामुळे प्रतिवादी यांना नि.नं. ४१ प्रमाणे तुर्तातुर्त मनाई अर्ज दाखल करता येणार नाही. When there is no final relief is claimed, then interim relief can not be granted. वादीने अर्जातील सर्व विरोधी कथने नाकारली आहेत.

२४. वादीचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी यांनी या दाव्यात प्रतिदावा केलेला नाही. तसेच इतर त्यामुळे कोणतीही अंतिम मागणी वादी विरूध्द केलेली नाही. प्रतिवादी यांना

वादी विरूध्द या दाव्याचेकामी कोणत्याही प्रकारचा अंतरीम आदेश मे. कोर्टाकडून प्राप्त करून घेणेचा हक्क, अधिकार नव्हता व नाही.

२५. वादीचे पुढे असे कथन आहे की, दावा मिळकतीशी यातील प्रतिवादी यांचा कोणत्याही प्रकारचा दावा कलम १ मध्ये हक्क, अधिकार, हितसंबंध नव्हता व नाही. वर्णन केलेली मिळकत यातील वादी यांनी मच्छिंद्र भानुदास चौगुले यांचेकडून दि. ०६/१०/२०२३ रोजी रक्कम रू.३,३५,०००/– या रक्कमेस नोंदणीकृत खरेदी दस्त ६१००/२०२३ प्रमाणे खरेदी केलेली असून खरेदी तारखेपासून दावा मिळकतीत वादीची शांततामय मार्गाने कब्जेवहिवाट चालु आहे. वादी हे दावा कलम १ मध्ये नमूद केलेल्या मिळकतीचे कायदेशीर मालक वहिवाटदार आहेत. दावा मिळकतीशी प्रतिवादीचा कोणताही हितसंबंध नव्हता व नाही. वादीने दाखल केलेला दावा नि.नं.१ मधील मजकुर या म्हणण्याचा एक भाग आहे असे समजणेत यावे.

२६. वादीचे पुढे असे कथन आहे की, वादीनी खरेदी केलेल्या मिळकतीच्या लगत पुर्व बाजूस प्रतिवादी यांची ०हे–२३.५०आर, पो.ख. ०हे–०५आर ही मिळकत असून प्रतिवादी हे वादीच्या मिळकतीमध्ये अतिक्रमण करण्याचा व वादीस दावा मिळकतीतून हुसकावून लावणेचा तसेच वादीचे दावा मिळकतीतील शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करण्याचा प्रयत्न करू लागल्याने वादीने प्रतिवादी विरूध्द प्रस्तुतचा दावा निरंतर ताकीदीसाठीचा दाखल केलेला आहे व सदर दाव्यात वादीनी प्रतिवादी विरूध्द नि.नं. ५ प्रमाणे तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज दाखल केलेला असून नि.नं.५ चे कामकाज युक्तिवादाकरीता नेमलेले आहे.

२७. वादीचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी यांचा दावा मिळकतीशी कोणताही हितसंबंध नसताना प्रतिवादी यांनी नि.नं. ४१ प्रमाणे बेकायदेशीर अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादी हे मे. कोर्टाकडून बेकायदेशीर आदेश प्राप्त करून वादी यांना दावा मिळकतीतील कायदेशीर मालकी हक्क, अधिकारापासून वंचित ठेवण्याचा केविलवाणा प्रयत्न प्रतिवादी करू लागलेला आहे. दावा कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे पूर्ण मालक वादी असल्याने

वादी यांना त्यांचे मालकी हक्काप्रमाणे दावा मिळकतीचा वापर, उपयोग, उपभोग करण्याचा हक्क व अधिकार आहे. खरेदीखत तारखेपासून दावा मिळकतीत वादीची शांततामय कब्जेवहिवाट आहे. दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी योग्य त्या फेरफाराने वादीच्या नावाची नोंद झालेली आहे. प्रथमदर्शनी न्यायाचा समतोल वादीचे बाजूने आहे. प्रतिवादी यांनी विनाकारण दाव्यात गुंतागुंत करण्याचे हेतूने नि.नं.४१ चा बेकायदेशीर अर्ज दाखल केलेला आहे.

२८. वादीचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी यांनी नि.नं. ४१ प्रमाणे दाखल केलेला अर्ज कायद्यातील कोणत्या तरतुदीप्रमाणे दाखल केलेला आहे याबाबतचा उल्लेख केलेला नाही. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज दाखल करून विनाकारण मे. कोर्टाचा वेळ वाया घालवलेला आहे. तसेच प्रस्तुत वादी यांना आर्थिक खर्चात पाडलेले आहे. नि.नं. ४१ मधील प्रतिवादी यांची मे. कोर्टाकडील मागणीचा विचार करता प्रतिवादी याने स्वतंत्रपणे दावा दाखल करून सदर दाव्यात प्रतिवादी यांना आवश्यक असणाऱ्या मागण्या मे. कोर्टाकडे करणे आवश्यक आहे. तरी नि.नं.४१ चा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा अशी विनंती वादीने केली आहे.

२९. वादी व प्रतिवादी तर्फे विद्वान विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. वादी, प्रतिवादी यांचे वादकथनावरुन खालील मुद्दे निशाणी क्र.५ वरील अर्जाच्या अनुषंगा माझे विचारार्थ उपस्थित होत असून त्यांचे निश्कर्ष त्यांच्या कारणामिमांसेसह त्याखाली नमुद केले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीने आपले प्रकरण प्रथमदर्शनी आहे हे सिध्द केले आहे का ? | होकारार्थी |
| २. | या प्रकरणातील तौलानिक न्याय वादीच्या बाजूने आहे काय ? | होकारार्थी |
| ३. | मागणी प्रमाणे तुर्तातुर्त ताकीद न मिळालेस वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | होकारार्थी |
| ४. | अंतिम आदेश ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

३०. वादी, प्रतिवादी यांचे वादकथनावरुन खालील मुद्दे निशाणी क्र.४१ वरील अर्जाच्या अनुषंगा माझे विचारार्थ उपस्थित होत असून त्यांचे निश्कर्ष त्यांच्या कारणामिमांसेसह त्याखाली नमुद केले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रतिवादीने आपले प्रकरण प्रथमदर्शनी आहे हे सिध्द केले आहे का? | नकारार्थी |
| २. | या प्रकरणातील तौलानिक न्याय प्रतिवादीच्या बाजूने आहे काय ? | नकारार्थी |
| ३. | मागणी प्रमाणे तुर्तातुर्त ताकीद न मिळालेस प्रतिवादी अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | नकारार्थी |
| ४. | अंतिम आदेश ? | अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

३१. वादीने आपल्या कथनाचे पुष्टयर्थ दाखल केलेल्या कागदपत्राची यादीः–

| अ.क्र. | कागदपत्राचा तपशील | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १. | मौजे चोपडी, ता. सांगोला येथील जमीन गट नंबर ३२५ चा ७/१२ उतारा | ८ |
| २. | दुय्यम निंबधक कार्यालय सांगोला यांचेकडील खरेदीदस्त क्र.६१००/२०२३ | ४/२ |

३२. प्रतिवादी आपल्या कथनाचे पुष्टयर्थ दाखल केलेल्या कागदपत्राची यादीः–

| अ.क्र. | कागदपत्राचा तपशील | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १. | खरेदीखत नोंदणी क्र.२९११/२०२० | २९/१ |
| २. | प्रतिवादीने जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे दाखल केलेल्या केसची प्रत | २९/२ |
| ३. | प्रतिवादीने सांगोला पोलिस स्टेशन येथे दाखल केलेला तक्रार अर्ज | २९/३ |
| ४. | प्रतिवादी व वादी यांच्यातील संभाषणाचे ऑडीओ रेकॉर्डींगचा पेन ड्राईव्ह | ३५/१ |
| ५. | प्रतिवादीच्या पत्नीने वादी विरुदध दिलेल्या NCR ची प्रत | ४०/१ |

| | | |
|---|---|---|
| ६. | दिवाणी न्यायालय क. स्तर वरोरा यांनी दिलेल्या आदेशाची प्रत | ४६/१ |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्रमांक १ ते ३ बाबतः–**

३३. निशाणी क्र.५ व नि.क्र.४१ अर्जाच्या मुद्दा क्रमांक १ ते ३ याचे विवेचन एकमेकांशी संलग्न असल्याने पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्याचे गुणग्रहण एकत्रितरित्या केले आहे. वादींना त्यांच्या हक्कात तुर्तातूर्त ताकीद मिळवण्यासाठी सकृतदर्शनी केस वादीच्या हक्कात आहे, अर्ज मंजूर न झाल्यास वादीचे पैशाच्या स्वरूपात न भरुन येणारे नुकसान होईल तसेच न्यायाचा तराजू वादीच्या बाजूने आहे याबाबी सिध्द करणे आवश्यक आहे. तसेच प्रतिवादींना त्यांच्या हक्कात तुर्तातुर्त ताकीद मिळवण्यासाठी सकृतदर्शनी केस प्रतिवादीच्या हक्कात आहे, अर्ज मंजूर न झाल्यास प्रतिवादीचे पैशाच्या स्वरूपात न भरुन येणारे नुकसान होईल तसेच न्यायाचा तराजू प्रतिवादीच्या बाजूने आहे याबाबी सिध्द करणे आवश्यक आहे.

३४. वादींनी प्रस्तुतचा दावा निरंतर ताकीदीचा दाखल केला आहे. वादीचे असे कथन आहे की, मौजे लिगाडेवाडी येथील गट क्र.३२५ मधील ८०आर जमिन (दावा मिळकत) याचा वादी मालक व कब्जेदार आहे. प्रतिवादीची जमिन दावा मिळकतीच्या पूर्व बाजूस आहे. प्रतिवादी वादीच्या दावा मिळकतीवरील कब्जास हरकत अडथळा करत आहेत. उलटपक्षी प्रतिवादीचे असे कथन आहे की, गट क्र.३२५ मध्ये प्रतिवादी १हे–०३आर क्षेत्राचा मालक व कब्जेदार आहे. प्रतिवादीने ऑगस्ट २०२० मध्ये आर्थिक अडचणीसाठी सदर जमिन मच्छींद्र भानुदास चौगुले यांना कर्जाऊ रकमेच्या मोबदल्यात तारण म्हणून दिली होती. प्रतिवादीने कर्ज रक्कमेची पूर्तता केली असतानाही मच्छींद्र भानुदास चौगुले यांनी प्रतिवादीला उलट खरेदी नोंदवून दिली नाही व सदर जमिन वादीला विक्री केली.

३५. वादीने त्याची वाद मिळकतीवर मालकी व ताबा दर्शवण्यासाठी मौजे लिगाडेवाडी येथील गट क्र.३२५ चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादी ब्रम्हदेव बाबर यांच्या नावाची नोंद ८०आर क्षेत्राला झाली

आहे व प्रतिवादीच्या नावाची नोंद ०हे–२३.५०आर क्षेत्राला झाली आहे. वादीने मच्छींद्र भानुदास चौगुले यांनी वादीच्या हक्कात करुन दिलेल्या नोंदणीकृत खरेदीखत क्र.६१००/२०२३ याची प्रत दाखल केली आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, मच्छींद्र भानुदास चौगुले यांनी गट क्र.३२५ मधील ८०आर क्षेत्र वादीला विक्री केले आहे. सबब सदर अभिलेखावरुन वादीच्या कथनांना पुष्ठी मिळते. तसेच प्रतिवादीच्या कथनानुसार गट क्र.३२५ मध्ये १हे–०३आर जमीन आहे या कथनांना पुष्ठी मिळत नाही.

३६. प्रतिवादीचे असे कथन आहे की, मच्छींद्र भानुदास चौगुले यांना कर्जावू रक्कमेच्या परतफेडीपोटी प्रतिवादीने दस्त क्र.२९११/२०२० केला होता. परंतु सदरचा दस्त खरेदीखत म्हणून अस्तित्वात आणला असला तरीसुध्दा केवळ कर्जावू रक्कमेच्या परतफेडीपोटी सदरचा दस्त करण्यात आला होता. प्रतिवादीचे थोडक्यात असे कथन आहे की, मच्छींद्र भानुदास चौगुले यांना प्रतिवादी कधीही गट क्र.३२५ मधील जमिन विक्री करु इच्छीत नव्हता. प्रतिवादीने दस्त क्र.२९११/२०२० ची प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रतिवादी हणमंत काटे याने रु.७,००,०००/– च्या मोबदल्यामध्ये गट क्र.३२५ मधील ८०आर क्षेत्राचे खरेदीखत मच्छींद्र भानुदास चौगुले यांना करुन दिले आहे. सकृतदर्शनी सदर दस्तामध्ये तारण व्यवहाराबाबत कोणतीही अट नमुद नाही.

३७. प्रतिवादीचे असे कथन आहे की, त्याने मच्छींद्र भानुदास चौगुले यांच्याकडून कर्जावू रक्कम रू.७,००,०००/– शेकडा दरमहा २% व्याजाने दिले व त्यास तारण म्हणून दावा मिळकत दिली. दि.३१/१२/२०२० रोजी रु.१,८५,०००/– मच्छींद्र भानुदास चौगुले यांच्या सांगण्यानुसार प्रतिवादीने धनाजी शिवाजी बाबर याचे नावे आर.टी.जी.एस. द्वारे दिले. तसेच प्रतिवादीचे असे कथन आहे की, दि.२१/०३/२०२२ रोजी प्रतिवादीचे मोठा मुलगा गौतम याच्या भारतीय स्टेट बँक शाखा सांगोला या बँक खात्यावर रु.५,००,०००/– मच्छींद्र चौगुले यास काढून रोख स्वरुपात दिले. तसेच उर्वरीत रक्कम सन २०२२ अखेर पर्यंत संपूर्णपणे परत फेड दिलेली आहे. ही बाब महत्वपूर्ण आहे की, प्रतिवादीने सदर कथनांच्या पृष्ठ्यर्थ सकृतदर्शनी महत्वपूर्ण असे काहीही अभिलेखावर आणलेले नाही. सबब, सकृतदर्शनी

प्रतिवादीच्या दावा मिळकत तारण व्यवहारापोटी मच्छींद्र भानुदास चौगुले यांच्याशी खरेदीखत न होता तारण व्यवहार झाला होता या कथनांना पुष्ठी मिळत नाही. मच्छींद्र भानुदास चौगुले यांनी वादीला गट क्र.३२५ मधील दावा मिळकत नोंदणीकृत खरेदीखत क्र.६१००/२०२३ अन्वये विक्री केल्याचे प्रतिवादीने नाकारलेले नाही. तसेच प्रतिवादीच्या कथनानुसार प्रतिवादीने सदर दस्त त्याच्या कथित हक्कांवर परिणाम करणारा असतानाही त्याबाबत योग्य दाद मागितलेली नाही.

३८. प्रतिवादीतर्फे विधीज्ञांनी असा युक्तिवाद केला की, दस्ता नोंदणी क्र.२९११/२०२० व खरेदीखत दस्त क्र.६१००/२०२३ यामध्ये नमुद असणा–या चतुःसिमांमध्ये विसंगती आहेत. अभिलेखानुसार प्रतिवादीने खरेदीखत नोंदणी क्र.२९११/२०२० मच्छींद्र भानुदास चौगुले यांच्या हक्कात गट क्र.३२५ मधील ८०आर क्षेत्राच्या अनुषंगाने करुन दिले आहे. खरेदीखत दस्त क्र.६१००/२०२३ मच्छींद्र भानुदास चौगुले यांनी वादीच्या हक्कात गट क्र.३२५ मधील ८०आर क्षेत्राबाबत (दावा मिळकतीबाबत) करुन दिले आहे. प्रतिवादीतर्फे खरेदीखतांमधील चतुःसिमेबाबत विसंगती असल्याचे कैफियतीमध्ये कथन केलेले नाही. तसेच प्रतिवादीने मच्छींद्र भानुदास चौगुले यांच्याशी गट क्र.३२५ मधील जमिनीचा व्यवहार केला ती जमिन भिन्न असल्याचे कथन केलेले नाही. प्रतिवादींनी दावा मिळकतीच्या चतुःसिमा नाकारलेल्या नाहीत अथवा त्याचे ठोस खंडण केलेले नाही. अशा परिस्थितीमध्ये दोन्ही खरेदीखतांची विश्वासार्हता पुराव्याअंती ठरेल. सकृतदर्शनी प्रतिवादीने दावा मिळकतीच्या चतुःसिमांचे खंडण केलेले नाही. त्यामुळे खरेदीखतातील चतुःसिमेतील विसंगती बाबत प्रतिवादीचा युक्तिवाद ग्राह्य धरता येणार नाही.

३९. वादीतर्फे असा युक्तिवाद केला की, प्रतिवादीने प्रतिदावा दाखल केलेला नाही. सबब, प्रतिवादीला तुर्तातुर्त ताकीद अर्ज दाखल करता येणार नाही. परंतु दिवाणी प्रक्रिया संहीता आदेश ३९ नियम १ व २ नुसार दाव्यातील कोणताही पक्ष मनाई हुकूमासाठी अर्ज करु शकतो. सबब, कोणताही पक्ष याची व्याप्ती मोठी असून त्यामध्ये प्रतिवादीचाही समावेश होतो. मात्र प्रतिवादीला त्याच्या हक्कात सकृतदर्शनी केस आहे तसेच अर्ज नामंजूर केल्यास प्रतिवादीचे

पैशाच्या स्वरूपात न भरुन येणारे नुकसान होईल, न्यायाचा तराजू प्रतिवादीच्या हक्कात आहे याबाबी सिध्द करणे आवश्यक आहे.

४०. प्रतिवादीने त्याच्यातील व वादीमधील संभाषणाच्या ऑडीओ रेकॉर्डीगचा पेन ड्राईव्ह दाखल केला आहे. यापूर्वीच नमुद केल्याप्रमाणे सकृतदर्शनी अभिलेखावर दाखल कागदपत्रे वादीच्या हक्कात आहेत. तसेच ऑडीओ रेकॉर्डीगबाबत भारतीय पुरावा कायदा कलम ६५(ब) नुसारचे प्रमाणपत्र प्रतिवादीने हजर केलेले नाही. सदर ऑडीओ रेकॉर्डीगची सत्यता व विश्वसनीयता पुराव्याअंती ठरेल. सबब सद्यपरिस्थितीमध्ये केवळ पेन ड्राईव्ह मधील संभाषण प्रतिवादीला सकृतदर्शनी केस त्याच्या हक्कात आहे हे सिध्द करण्यासाठी उपयुक्त नाही. प्रतिवादीने त्याच्या पत्नीने वादीविरुध्द दिलेल्या पोलिस तक्रारीची प्रत तसेच प्रतिवादीने स्वतः दिलेल्या पोलिस तक्रारीची प्रत दाखल केली आहे. प्रतिवादीने जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे सावकारीच्या संबंधाने दाखल केलेल्या प्रकरणाची प्रत दाखल केली आहे. यापूर्वीच नमुद केल्याप्रमाणे प्रतिवादीने त्याच्या कथनानुसार तारण व्यवहार असताना वादीला खरेदीखत करुन देणा-या मच्छींद्र भानुदास चौगुले याच्या विरुध्द दाद मागितलेली नाही. तसेच वादीविरुध्द कोणतीही महत्वपूर्ण कारवाई झाल्यामुळे प्रतिवादीचे हक्क शाबित झाले असा कोणताही पुरावा प्रतिवादीने आणलेला नाही. सबब, प्रतिवादीने दाखल केलेली कागदपत्रे प्रतिवादीची मागणी मान्य करण्यास पुरेशी नाही. प्रतिवादीने दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर वरोरा येथील नियमीत दिवाणी दावा क्र.७६/२०१४ मध्ये निशाणी क्र.२२ वर पारित झालेल्या आदेशाची प्रत हजर केली आहे. प्रतिवादीतर्फे विधीज्ञांनी असा युक्तिवाद केला आहे की, सदर आदेशातील "It is hereby made clear that the Court has not in any way declared any right in favour of the defendant over the suit property by passing this order. The only intention is to keep peace between the parties and to temporarily satisfy the basic need of the defendant and his family." यावर भिस्त ठेवली आहे. सदर आदेश व प्रस्तुत अर्जातील कथने यामध्ये विभीन्नता आहे. त्यामुळे सदर आदेश प्रस्तुत अर्जाला लागु होणार नाही.

४१. अभिलेखाचे एकंदरीत अवलोकन केले असता वादीच्या हक्कात मच्छींद्र भानुदास चौगुले यांनी दावा मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत करुन दिल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. प्रतिवादी मच्छींद्र भानुदास चौगुले यांना तारणव्यवहारापोटी दस्त करुन दिल्याचे सकृतदर्शनी सिध्द करु शकला नाही. मच्छींद्र भानुदास चौगुले यांनी प्रतिवादीकडून खरेदी केलेली दावा मिळकत वादीला विक्री केली आहे. प्रस्तुत प्रतिवादींनी मच्छींद्र भानुदास चौगुले यांच्याबरोबर तारण व्यवहार असतानाही विक्री केल्याबाबत दाद मागितलेली नाही व त्यांना प्रस्तुत दाव्यात पक्षकारही केले नाही. सबब, वादीची सकृतदर्शनी दावा मिळकतीची मालकी सिध्द होते. "Possession follows title" या कायद्याच्या गृहीतकानुसार सकृतदर्शनी वादीचा दावा मिळकतीवर ताबा असल्याचे दिसुन येते. प्रतिवादीने वादीचा मालकी हक्क नाकारला आहे. सबब, वादीच्या ताब्यास सकृतदर्शनी अडथळा असल्याचे दिसुन येते. सबब, सकृतदर्शनी केस वादीच्या हक्कात आहे, नि.क्र.५ नुसार तुर्तातुर्त मनाई आदेश न झाल्यास वादीचे पैशाच्या स्वरूपात न भरुन येणारे नुकसान होईल, न्यायाचा तराजू वादीच्या हक्कात आहे.

४२. एकंदरीत प्रतिवादी त्याचा दावा मिळकतीवर ताबा असल्याचे सिध्द करण्यास सकृतदर्शनी असमर्थ ठरला आहे. वादी प्रतिवादीच्या हक्कांना डावलून दावा मिळकत हस्तांतरीत करण्याच्या प्रयत्नात आहेत असेही दर्शवण्यास प्रतिवादी असमर्थ ठरला आहे. सबब, नि.४१ च्या अनुषंगाने सकृतदर्शनी केस प्रतिवादीच्या हक्कात नाही. प्रतिवादीचा तुर्तातुर्त ताकीद अर्ज नामंजूर केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. न्यायाचा तराजू प्रतिवादीच्या हक्कात नाही.

४३. वरील विवेचनानुसार नि.क्र.५ वरील अर्जाच्या अनुषंगाने मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर होकारार्थी व मुद्दा क्र.४१ वरील अर्जाच्या अनुषंगाने मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवण्यात येते. नि.२६ वरील अर्ज वादीने ॲड इंटेरिम तुर्तातुर्त ताकीदीचा दिला होता. वादीच्या नि.क्र.५ वरील अर्जामध्ये सदरचा अर्ज समाविष्ठ होतो. सबब, नि.क्र.५ वरील अर्जाच्या व नि.क्र.४१ वरील अर्जाच्या अनुषंगाने मुद्दा क्र.४ करीता खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## आदेश

१. वादींचा नि. क्र. ५ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादीने स्वतः अगर इतरांमार्फत वादीचे दावा कलम १ मधील मिळकतीस दाव्याच्या अंतिम निकालापर्यंत हरकत अडथळा करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद देण्यात येत आहे.

३. प्रतिवादीचा नि.क्र.४१ वरील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

४. नि.क्र.२६ वरील अर्ज नि.क्र.५ मध्ये समाविष्ठ करण्यात येतो.

५. वादी व प्रतिवादींनी आपापला खर्च सोसावा.

PRACHI RAVINDRA KULKARNI Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI Date: 2026.04.28 17:07:16 +0530

सांगोला.
दिनांक– २८/०४/२०२६.

( श्रीमती पी. आर. कुलकर्णी )
दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgement/order :-

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | :- | S. S. Patne |
| (b) | Court | :- | Civil Judge Junior Division and Judicial Magistrate First Class, Sangola. |
| (c) | Judgment/Order signed by PO on | :- | 28/04/2026 |
| (d) | Judgment/Order uploaded on | :- | 28/04/2026. |